उपरोक्त संदर्भिय आदेश क्र. ५ मधील परिच्छेद १ मध्ये खालीलप्रमाणे निदेश देण्यात आलेले आहेत:

" " क " वर्ग नगरपालिका / नगरपालिका शिक्षण मंडळ यांच्या लेखापरीक्षणाकरिता पथकप्रमुख सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी राहतील व त्यांच्या कामाचे सनियंत्रण व अहवाल अंतिमीकरण लेखापरीक्षा अधिकारी करतील." (ही तरतूद संचालनालयाचे संदर्भाधिन क्र. ८ मधील आदेश क्र. ३, दि. २०/०३/२०१२ अन्वये वगळण्यात आलेली आहे.)

याच आदेशातील मुद्दा क्र. ३ (३) नुसार, (संदर्भिय आदेश क्र. ५)

" " क " वर्ग नगरपालिका / नगरपालिका शिक्षण मंडळाच्या अनुपालनाची पडताळणी लेखापरीक्षा अधिकारी करतील. "

उपरोक्त तरतूदीनुसार लेखापरीक्षा अधिकारी यांच्याकडे जबाबदारी सोपविण्यात यावी.

६) उपरोक्त संदर्भिय आदेश क्र. ७ मधील परिच्छेद क्र. ११ मध्ये ग्रामपंचायत लेखापरीक्षण अहवालाच्या पुनर्विलोकनासंबंधी लेखापरीक्षा अधिकारी यांची जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे आणि वरील संदर्भिय आदेश क्र. ९ नुसार त्याबाबत पुन्हा स्पष्ट आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुसार लेखापरीक्षा अधिकारी यांनी खालीलप्रमाणे ग्रामपंचायत लेखापरीक्षण अहवालाचे पुनर्विलोकन करावयाचे आहे :

१) रु. १० लाखापर्यंत उत्पन्न असलेल्या ग्रामपंचायती : - १० % अहवालांचे पुनर्विलोकन.

२) रु. १० लाख ते ५० लाखापर्यंत उत्पन्न असलेल्या ग्रामपंचायती :- २५% अहवालांचे पुनर्विलोकन.

पुनर्विलोकन अहवाल तयार केल्यानंतर ज्या अधिकाऱ्याने पुनर्विलोकन केलेले आहे त्याच्या स्वाक्षरीनिशी तो अहवाल निर्गमित करावयाचा आहे.

७) संचालनालयाचे उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. ६ नुसार हे स्पष्ट करण्यात आले आहे की, सहाय्यक संचालक व लेखापरीक्षा अधिकारी हे ग्रामपंचायत लेखापरीक्षणामध्ये पथकप्रमुख म्हणून काम करु शकणार नाहीत.

जिल्हा स्तरावरील लेखापरीक्षणाचे एकूण कामकाज आणि त्यामध्ये असलेले लेखापरीक्षा अधिकाऱ्याचे स्थान आणि दर्जा विचारात घेऊन संचालनालयाने वरील सर्व आदेश निर्गमित केलेले आहेत. त्यांचे कटाक्षाने पालन होईल, याची दक्षता विभागीय सह संचालक आणि सहाय्यक संचालक यांनी घ्यावयाची आहे. वरील आदेशांनुसार लेखापरीक्षा अधिकारी यांच्यावर सोपविलेल्या जबाबदाऱ्यांनुसार त्यांनी आपली कर्तव्ये पार पाडावयाची आहेत.

१) उपरोक्त संदर्भिय आदेश क्र. १ मधील लेखापरीक्षणासंबंधीच्या तरतूदीमध्ये अ.क्र. ३ मध्ये नमूद केलेल्या " नगरपालिका ब वर्ग आणि नगरपालिका क वर्ग " या संबंधीच्या आणि अनुपालन पडताळणीसंबंधी अ.क्र. ८ मधील "(ड) ब वर्ग व क वर्ग नगरपालिका " यासंबंधी निर्धारित केलेली कार्यकक्षा वगळता उर्वरित सर्व तरतूदी कायम आहेत. त्यानुसार लेखापरीक्षा अधिकारी यांना कामकाज सोपविले जावे.

२) उपरोक्त संदर्भिय आदेश क्र. २ मधील तरतूदीनुसार लेखापरीक्षा अधिकारी यांनी प्रत्येक महिन्यामध्ये एका ग्रामपंचायतीचे प्रत्यक्ष चाचणी लेखापरीक्षण करावे. सदर लेखापरीक्षण हे उपरोक्त संदर्भ क्र. १ मधील आदेशातील अ.क्र. १ मध्ये नमूद केलेल्या १० % ग्रामपंचायत अहवालांच्या पुनर्विलोकनाव्यतिरिक्त असेल. सदर लेखापरीक्षणासाठी त्यांना २ श्रमदिवस मंजूर करण्यात यावेत.

३) उपरोक्त संदर्भिय क्र. ३ च्या परिपत्रकामधील मुद्दा क्र. १० मध्ये नमूद केल्यानुसार ग्रामपंचायत लेखापरीक्षणाचा मासिक कार्यक्रम अंतिम करताना अनावश्यक जास्त प्रमाणात श्रमदिन घालवले जाणार नाहीत याची दक्षता घेण्यासाठी जिल्हा सहाय्यक संचालक यांनी लेखापरीक्षा अधिकारी यांची मदत घ्यावी.

सदर परिपत्रकातील अ.क्र. ११ नुसार लेखापरीक्षा अधिकारी यांनी काही महत्वाच्या व्यवहारांचे लेखापरीक्षण स्वतः करण्यासाठी महिन्यातून किमान ७-८ दिवस प्रत्यक्ष लेखापरीक्षण करावे आणि त्याद्वारे कनिष्ठांना मार्गदर्शन करावे.

४) उपरोक्त संदर्भिय परिपत्रक क्र. ४ मधील परिच्छेद क्रमांक १२ नुसार लेखापरीक्षा अधिकारी हे जिल्हा परिषदेकडील कृषि, पशु संवर्धन, महिला व बालकल्याण, एकात्मिक बाल विकास व भविष्य निर्वाह निधी या विभागांचे लेखापरीक्षण पथक प्रमुख म्हणून राहतील. तसेच पंचायत समिती बाबत साधारणतः ५० % पंचायत समित्यांच्या लेखापरीक्षणाचे पथक प्रमुख हे सहाय्यक संचालक व उर्वरित पंचायत समित्यांच्या लेखापरीक्षणाचे पथकप्रमुख लेखापरीक्षा अधिकारी हे राहतील.

उपरोक्त परिपत्रकातील परिच्छेद क्र. १३ मधील निदेशानुसार " ब " वर्ग नगरपालिकांचे लेखापरीक्षण पथकप्रमुख लेखापरीक्षा अधिकारी राहतील. तसेच " क " वर्ग नगरपरिषद व नगरपंचायती यांच्या लेखापरीक्षण अहवालांचे अंतिमीकरण लेखापरीक्षा अधिकारी हे करतील.

५) उपरोक्त संदर्भिय आदेश क्र. ५ मधील परिच्छेद १ (ब) नुसार

" " ब " वर्ग नगरपालिका / नगरपालिका शिक्षण मंडळ यांच्या लेखापरीक्षणाकरिता पथकप्रमुख लेखापरीक्षा अधिकारी राहतील आणि त्यांच्या कामाचे सनियंत्रण व अहवाल अंतिमीकरण सहाय्यक संचालक करतील."

माहितीचा अधिकार

महाराष्ट्र शासन

स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

कोकण भवन, सहावा मजला, नवी मुंबई ४०० ६१४.

☎/ 🖷:- २२,२७५७१३११. Website:www.mahalfa.in E.Mail:ad.report@mahalfa.in

क्र.स्था-१८ / ब / लेपअ अधिकार व कर्तव्य / वलेप अहवाल / २०६१७ दिनांक :- 2 DEC 2013

प्रति,

१) सह संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
सर्व विभागीय कार्यालये.

२) सहाय्यक संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
सर्व जिल्हा कार्यालये.

**विषय :- लेखापरीक्षण संदर्भात लेखापरीक्षा अधिकारी यांचे अधिकार व कर्तव्ये.**

**संदर्भः-** १. संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्रमांक ५९, दिनांक ५/१०/१९९५.
२. संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्रमांक २७, दिनांक १८/७/१९९८.
३. संचालनालयाचे कार्यालयीन परिपत्रक क्र. स्था.१८/ब/ग्रा.पं.ले.प./एएर/१४२४, दिनांक ०१/१०/२००८.
४. संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक १६९४, दिनांक २७/११/२००८.
५. संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्रमांक ३६, दिनांक ३०/७/२००९.
६. संचालनालयाचे पत्र क्र. स्था.१८/ब/ग्रापं/एएर/५८६, दि. ०७/०४/२०११.
७. संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्रमांक २२, दिनांक १९/०४/२०११.
८. संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र. ६, दि. २०/०३/२०१२
९. संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्रमांक १९, दिनांक ०३/०७/२०१३.

लेखापरीक्षणाचे महत्व आणि व्याप्ती लक्षात घेऊन जिल्हा कार्यालयातील कामकाज प्रभावीपणे पार पाडण्यासाठी जिल्हा स्तरावर लेखापरीक्षा अधिकारी या महत्वाच्या पदाची निर्मिती करण्यात आली आहे. लेखापरीक्षणासंदर्भात लेखापरीक्षा अधिकारी या पदाच्या अधिकार व कर्तव्यांसंबंधी उपरोक्त संदर्भाधिन आदेशान्वये संचालनालयाने वेळोवेळी आदेश निर्गमित केलेले आहेत. तथापि याबाबत असे निदर्शनास आले आहे की, वरील आदेशांचे पालन केले जात नाही. त्यामुळे लेखापरीक्षा अधिकारी यांचे अधिकार व कर्तव्ये पुनःश्च खालीलप्रमाणे अधोरेखित करण्यात येत आहेत:-

...२

दि. ०७/१०/२०१३ रोजी सर्व लेखापरीक्षा अधिकारी यांची बैठक संचालनालयाच्या स्तरावर आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये झालेल्या चर्चेनुसार उपरोक्त तरतूदींसोबतच खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

१) स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० कलम ८ नुसार लेखापरीक्षण पूर्ण झाल्यानंतर लेखापरीक्षणाचा अहवाल ३ महिन्याच्या आत संबंधीत संस्थांना सादर करावयाचा असतो. तत्पूर्वी उपरोक्त संदर्भाधिन आदेश क्र. ९ मध्ये नमूद केल्यानुसार लेखापरीक्षा अधिकाऱ्यांना आणि सहाय्यक संचालकांना लेखापरीक्षा अहवालाचे पुनर्विलोकन करावयाचे असते. त्यासाठी लेखापरीक्षकांनी लेखापरीक्षण पूर्ण झाल्यानंतर १ महिन्याच्या आत त्यांचे अहवाल पुनर्विलोकनासाठी सादर करणे आवश्यक आहे. संयुक्तिक कारणाशिवाय निर्धारित कालावधीत पुनर्विलोकनासाठी अहवाल सादर न करणाऱ्या लेखापरीक्षकांविरुध्द यापुढे कडक कारवाई करण्यात यावी.

२) वरील संदर्भ क्र. ४ मधील परिपत्रकातील परिच्छेद क्र. १२ नुसार पंचायत समितीबाबत साधारणत: ५० % पंचायत समित्यांच्या लेखापरीक्षणाचे पथक प्रमुख हे सहाय्यक संचालक व उर्वरित पंचायत समित्यांच्या लेखापरीक्षणाचे पथकप्रमुख लेखापरीक्षा अधिकारी हे राहतील, अशी तरतूद आहे. या तरतूदींचे काटेकोरपणे पालन होणे आवश्यक आहे. तथापि काही अपरिहार्य कारणांमुळे अपवादात्मक परिस्थितीत सहाय्यक संचालक यांना, त्यांना नेमून दिलेल्या जिल्हा परिषदांच्या विभागांच्या व पंचायत समित्यांचे लेखापरीक्षणासाठी पथकप्रमुख म्हणून उपस्थित राहणे शक्य होणार नसेल तेव्हा त्यांनी पथकप्रमुख म्हणून लेखापरीक्षा अधिकारी यांची नियुक्ती करावी. लेखापरीक्षा अधिकाऱ्यांच्या सेवा उपलब्ध असताना त्याहून कनिष्ठ कर्मचाऱ्याची नियुक्ती करता कामा नये.

३) महाप्रधान ग्रामपंचायतींच्या लेखापरीक्षणाचे काम लेखापरीक्षा अधिकाऱ्यांना देण्याबाबत सदर बैठकीत चर्चा झाली तथापि उपरोक्त संदर्भ क्र. ६ मधील संचालनालयाच्या पत्रात ग्रामपंचायत लेखापरीक्षणाचे पथकप्रमुख म्हणून सहाय्यक संचालक व लेखापरीक्षा अधिकारी यांना नियुक्त करता येणार नाही, हे स्पष्ट करण्यात आलेले आहे. त्यामुळे जिल्हा स्तरावरील ग्रामपंचायतीच्या कामाची प्रलंबित स्थिती, लेखापरीक्षकांचे उपलब्ध मनुष्यबळ आणि लेखापरीक्षा अधिकारी यांच्या सेवेची उपलब्धता आणि उपयुक्तता या सर्व बाबींचा विचार करुन त्यांना महाप्रधान ग्रामपंचायतींचे लेखापरीक्षण देणेबाबत योग्य तो निर्णय विभागीय सह संचालक यांनी घ्यावा.

(का.मा.विधाते)
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य.

surekha desktop MEETING A O meeting A O Jobchart २७१११३